



# शहरी पर्यावरणाचे रक्षण

– गौतम पटेल

नमस्कार. कायद्याशी संबंध नसलेल्या विषयांवर जाहीररित्या बोलायची संधी वकिलांना नेहमी मिळत नाही, आणि त्यामुळे आपली शहरे आणि त्यांच्या पर्यावरणाबद्दल माझे काही विचार आपल्यासमोर मांडण्याची संधी मला दिल्याबद्दल मी यूडीआरआय, राहुल मेहरोत्रा आणि पंकज जोशींचा आभारी आहे. मी काही आराखडातज्ज्ञ, वास्तुरचनाकार, अभियंता किंवा तसे पाहिले तर पर्यावरण शास्त्रज्ञ नाही. पण एक वकील म्हणून मी बराच काळ काही केले असेल तर ते असे की मुंबई आणि इतरत्र नियोजनविषयक कायदे आणि पर्यावरणविषयक समस्यांच्या बाबतीत काम केले आहे. मी तुम्हाला या समस्यांच्या कायदेशीर बाजूबद्दल सांगून कंटाळा आणणार नाही; तुम्हाला सांगतो, की ते काम खरोखरच अत्यंत कंटाळवाणे आहे. मला असा एक युक्तिवाद करायचा आहे की जो माझ्या मते शहरे, नियोजनाच्या पद्धती आणि पर्यावरण यांच्या दृष्टीने अत्यंत मूलभूत आहे.

'पर्यावरण' हा शब्द फारच विस्तृत अर्थाचा आहे आणि वाढत्या प्रमाणात अस्पष्ट होत चाललेला आहे. आपण जेव्हा 'पर्यावरणाचे रक्षण करणे' याबद्दल बोलतो, तेव्हा आपण नेमके कशाबद्दल बोलत असतो? शहरातील जंगले? किनारा? रस्ते बनवण्यासाठी केलेला झाडांचा सर्वनाश? सार्वजनिक मोकळ्या जागांचे जतन? आणि शहरातील हवेच्या गुणवत्तेचे काय? या सर्व नक्कीच पर्यावरणविषयक समस्या आहेत. आणि तसेच या सर्व शहरी समस्याही आहेत.

एक वैचारिक प्रयोग करून पाहू. समजा आपल्याकडे आपल्या संगणकावर किंवा कोणत्या तरी फाईलमध्ये काही वृत्तपत्रातील कात्रणे आहेत. काहींचा संबंध कोणीही ज्याला शहरी

समस्या म्हणेल अशा समस्यांशी आहे: इमारती, बांधकामे, विकास नियोजन इत्यादी. आणखी काही कात्रणे, झाडे कापण्यासाठी दिलेल्या परवानग्या आणि सार्वजनिक मोकळ्या जागांबाबतच्या सरकारी धोरणाबद्दल आहेत. आता समजा, आपल्याला ही कात्रणे नंतर कधीही चटकन मिळावी यासाठी एखाद्या फोल्डरमध्ये व्यवस्थित लावायची असली तर हे आपण कसे करणार? आपण पर्यावरणविषयक कात्रणे शहरी समस्याविषयक फोल्डरमधील एका फोल्डरमध्ये घालून ठेवणार? का याच्या उलटे करणार?

उघड आहे, याचे कोणतेही सोपे उत्तर नाही आणि मला तर याचे काही उत्तर आहे का, हीच शंका आहे. पर्यावरण हा विषय जास्त व्यापक असल्यामुळे मूळ फोल्डर पर्यावरणाबाबतचा असावा. का नेमके याच्या उलट असावे? कसेही पाहिले तरी शहरी समस्या या पर्यावरणाच्या समस्यांपेक्षा वेगळ्या सांगता येणार नाहीत, आणि आपण शहर नियोजनाबद्दल बोलताना पहिली चूक हीच करतो. आपण जेव्हा शहरातील गरीब लोकांच्या अवस्थेबद्दल आणि त्यांच्या विशिष्ट समस्यांबद्दल बोलतो, तेव्हा या चुकीचा अत्यंत नाट्यपूर्ण परिणाम दिसून येतो पाणी पुरवठा, स्वच्छता, आणि सर्वात महत्वाची समस्या म्हणजे परवडतील अशी घरे. माझे म्हणणे असे आहे, की गरीबी ही फक्त, किंवा मुख्यतः सुद्धा आर्थिक, सामाजिक किंवा शहरी समस्या नाही. ती एक पर्यावरणविषयक समस्या आहे, याचे साधे कारण असे की प्रदूषणाचा एक अत्यंत त्वरित होणारा परिणाम म्हणजे गरीबी निर्माण होणे हा असतो.

आपण जर जुन्या व्याख्या आणि त्यांची जरा जास्तच व्यवस्थित केलेली संबंधित वर्गीकरणे नाकारत असलो, तर आपल्याला त्यांचे अर्थ लावण्याच्या आपल्या पद्धतीसुद्धा पुन्हा तपासून पहायला हव्यात म्हणजे आपण वापरत असलेल्या शब्दांचा अर्थ लावणे, ते आपण कसे वापरतो ते, आणि त्यांचा संदर्भ. आधीच नको इतके चुकीचे शब्दप्रयोग सर्वत्र केले जाताहेत 'समतोल विकास' हा त्यातलाच एक जुना, आवडता शब्द आणि एखाद्या विशिष्ट प्रकल्पाच्या संदर्भात त्यांचा प्रत्यक्षात इतका जास्त वापर केला जातो आहे, की त्यांचा नेमका अर्थच कोणाला माहित नाहीसा झाला आहे. अधिक नेमका आणि योग्य अर्थ लावण्यासाठी, आपल्याला सुरुवातीलाच 'पर्यावरण' या शब्दाची एक व्यापक आणि सर्वसमावेशक व्याख्या स्वीकारायला हवी. अशा रीतीने अर्थ लावलेल्या या शब्दामध्ये विकास आराखड्यांपासून वृक्ष अधिकाऱ्यांच्या परवानग्यांपर्यंत सर्व काही समाविष्ट असेल. या व्यापक आणि अजूनही काहीशा ढोबळ व्याख्येमधून खाली जात आपल्याला छोटी छोटी एकके वेगळी करायला हवीत.

हे आपल्याला केले पाहिजे कारण शहराची संपूर्ण रचना आपण त्यातील सर्वात छोट्या एककाला कसे वागवतो यावर अवलंबून असते, आणि शहराचे सर्वात छोटे एकक म्हणजे नागरिक. कंपन्या नव्हे, लोक; समूह नव्हेत, एकेक व्यक्ती; राजकारणी नव्हेत, नागरिक. या ठिकाणी पुन्हा आपल्याला आपल्या व्याख्या किंचित बदलाव्या लागतील. लोक, व्यक्ती, नागरिक असे शब्द आपण नेमके कशाबद्दल बोलत आहोत हे खऱ्या अर्थाने दाखवत नाहीत. त्यामुळे आपण या शब्दांच्या ऐवजी शहराच्या वापरकर्त्यांबद्दल बोलले पाहिजे, कारण माणसाकडे कायदेशीर घर असो वा नसो, तो झोपडपट्टीत किंवा झोपडीत किंवा पदपथावर, कुठेही राहत असो, तो शहराचा वापरकर्ता असतो आणि त्याला काही मूलभूत हक्क मिळण्याचा तितकाच अधिकार असतो. आपण जेव्हा शहर रचना आणि पर्यावरणाच्या रक्षणाबद्दल विचार करतो, तेव्हा त्यामधील सर्वात मूलभूत चूक कदाचित हीच असते: आपण फक्त अशांवरच लक्ष केंद्रित करतो की जे कुठल्या तरी तांत्रिक व्याख्येनुसार कायदेशीर मालक असतात, आणि अशा प्रचंड लोकसंख्येकडे साफ दुर्लक्ष करतो की जी सुद्धा शहराची सेवा करत असते पण बेकायदेशीर' ठरवलेल्या भागांमध्ये नाईलाजाने जगत असते. झोपडपट्ट्यांमध्ये राहणारे लोक काही गुन्हेगार नसतात. त्यांना नाईलाजाने झोपडपट्ट्यांमध्ये राहावे लागते कारण सरकार त्यांना परवडतील अशी घरे देत नाही. झोपडपट्ट्यांमध्ये राहणारे लोक काही सामाजातील बांडगुळे नसतात. ते अशा वस्तू आणि सेवा पुरवतात की ज्या नसत्या, तर आपल्याला जगणे अशक्य झाले असते. तरीही त्यांचा विचार न करण्याची आपली प्रवृत्ती असते. आपले घर झाडणारी बाई कुठे आणि कोणत्या परिस्थितीत राहते? आपल्याला घरी अंडी, पाव किंवा रोजच्या पूजेसाठी लागणारी फुले आणून देणाऱ्या त्या माणसाचे काय? केवळ ते बेकायदेशीर परिस्थितीत जगतात, म्हणून त्यांचे कामही बेकायदेशीर होते का? नसेल, तर त्यांना राहण्यायोग्य घरे देण्याऐवजी झोपडपट्टीत राहण्याबद्दल तेथून हाकलून देऊन शिक्षा देण्यामुळे जेथे मुळात त्यांना नाईलाजानेच राहावे लागत असते मानव म्हणून त्यांचे, त्यांच्या कामाचे, त्यांच्या सेवांचे आणि शहराचेही अवमूल्यन होते. इतर सर्वांसारखेच गरीब आणि बेघर लोकही शहराचे वापरकर्ते

असतात, आणि इतर कोणासारखाच त्यांनाही जास्त मानवी शहरी पर्यावरण आणि संरक्षण मिळण्याचा हक्क असतो.

आपण म्हणतो की झोपडपट्ट्या या प्रदूषण वाढवतात आणि त्या पर्यावरणाच्या दृष्टीने धोकादायक असतात. असे खरच असते का? झोपडपट्टी म्हणजे काय, आणि झोपडपट्टी आणि कोणत्याही अनियोजित आणि स्वनियंत्रित असलेल्या एखाद्या नागरी वसाहतीमध्ये काय फरक आहे? धारावीला झोपडपट्टी कसे म्हणावे हे मला समजत नाही. केवळ शहर नियोजनाची परवानगी नाही, म्हणून काही या स्वयंशिस्त असलेल्या, प्रचंड क्रियाशील असलेल्या मानवी वस्तीचे व्यक्तिमत्व खराब होत नाही. धारावी हा पर्यावरणाला धोका नसून, त्या भागाला मूलभूत मानवी सोयीसुविधा नाकारणे हा आहे. आणि तेथून गरीबांना हाकलून देऊन श्रीमंत लोकांना आणण्यामुळे तो नाहीसा होणार नाही. हाच तर्क जर लावला तर टोकियोचा 'गिंझा' भागसुद्धा झोपडपट्टी आहे असेच म्हणावे लागेल. पण आजवर असे कोणी म्हटलेले नाही.

वाढत्या प्रमाणावर लोक असे म्हणू लागले आहेत, की आपल्याला गरज आहे ती दहा वेगवेगळ्या वरिष्ठांना जबाबदार असणाऱ्या नोकरशहापेक्षा एकाच द्रष्ट्या नेत्याची, आणि या शहरातून निवडून न आलेला नागरीक विकास खात्याचा मंत्री तर आपल्याला मुळीच नको. शहराचे आमूलाग्र परिवर्तन करणाऱ्या द्रष्ट्या शहरप्रमुखाचे उदाहरण म्हणून लोक क्युरिटिबा चे नाव घेतात. मला माफ करा, पण मला तरी हे फारच भोळसटपणाचे वाटते. आपण वृत्तपत्रांमध्ये जे वाचतो, त्यावरून कोणी खंबीर नेता एकाच वेळी द्रष्टा आणि सच्च्या वृत्तीचा असेल यावर कधीही विश्वास बसणे शक्य नाही. पूर्वी सचोटी आणि इमानदारी या गोष्टी गृहित धरल्या जायच्या, आता मात्र त्या 'क्वालिफिकेशन्स' झाल्या आहेत. पण तरीही काही चमत्कार घडला आणि आपल्याला असा एखादा देवदूत आपल्या शहरासाठी मिळालाच, तरी आपल्याला कायद्याने जखडून टाकले आहे असे लवकरच त्याच्या लक्षात येईल.

याचे कारण म्हणजे आपल्या शहर नियोजन कायद्यांचा अस्ताव्यस्तपणा. शहरी आणि ग्रामीण अशा सर्व भागांसाठी लागू असलेला आपला सर्वात प्रमुख कायदा, महाराष्ट्र प्रादेशिक व शहर नियोजन कायदा, हा असेच गृहीत धरून काम करतो, की कुठल्या तरी सरकारी कार्यालयात बसलेल्या कोणा माणसाला प्रत्येकासाठी कोणती गोष्ट हितकारक आहे हे नेमके माहित आहे मग ते धारावीमधील प्लास्टिकच्या कारखान्यात काम करणाऱ्या कामगारासाठी असो किंवा अल्टमाँट रोड वर ४००,००० चौरस फुटांच्या ७ जणांच्या अब्जाधीश कुटुंबासाठी. हा नियोजन अधिकारी म्हणजे देव आहे, आणि या देवाला पुढची दहा-वीस वर्षे प्रत्येकासाठी कोणती गोष्ट हितकारक आहे हे माहित आहे.

हे गृहितक किती चुकीचे आहे हे लगेच दिसते. कोणाही नियोजकाला, मग तो कितीही द्रष्टा असला तरी, आयटी उद्योगाचे किंवा त्याच्या मागण्यांचे पूर्वानुमान करता आले नाही. हा उद्योग नियोजित आहे, आणि त्याच्या स्वतःच्या अशा काही अत्यंत खास गरजा आहेत. त्यामुळे आयटी पार्क्सना शहरात जिथे जागा सापडेल तिथे, इच्छा असो वा नसो, अक्षरशः कोंबले गेले, त्यांच्या गरजा पूर्ण झाल्या आहेत का याकडे अजिबात लक्ष दिले गेले नाही, आणि त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे, त्या गरजा भागवताना त्यांचा आसपासच्या भागांवर काय परिणाम होत आहे, याचा तर अजिबातच विचार केला गेला नाही.

संकल्पना या दृष्टीने कायद्याने ठरवलेला नियोजनाचा दृष्टिकोन हा जसा असायला हवा त्याच्या नेमका विरुद्ध आहे. आपला हा नियोजन अधिकारीरूपी देव आधी आराखडा बनवतो आणि मग लोकांना, अर्थात, शहराच्या वापरकर्त्यांना आवाहन करतो 'आक्षेप नोंदवा' आणि 'सूचना पाठवा'. हे म्हणजे वास्तुरचनाकार आणि अभियंत्याने आधी घर बांधून नंतर ग्राहकाला यात काय चुका आहेत ते सांगा असे विचारण्यासारखे आहे. कायदा हे विसरतो की येथे शहराचा वापरकर्ता हाच तो ग्राहक आहे; त्याच्या गरजा, इच्छा, आकांक्षा काय आहेत हे आधी पाहिले पाहिजे, नंतर त्यानुसार शहराचा आराखडा बनवला पाहिजे, आणि त्या गरजा जास्तीत जास्त पूर्ण होतील हे बघून मगच शहराची उभारणी केली पाहिजे. वास्तुरचनाशास्त्रामध्ये, पर्यावरणविषयक काम आणि कायद्यामध्येदेखील प्रत्येक तज्ज्ञामध्ये असतो तसा एक अहंकार आहे. ते म्हणते, हे पहा, तुमच्यासाठी काय चांगले आहे हे आम्हाला माहित आहे, तुम्हाला ते समजत नाही कारण तुम्ही तज्ज्ञ नाही. वास्तुरचनाशास्त्रामध्ये याचा परिणाम इमारत प्रचंड आणि भव्य असलीतरी कायमच अत्यंत वाईट डिझाईनमध्ये होतो; पर्यावरणविषयक कामामध्ये याचा परिणाम मी ज्याला 'इकॉलॉजिकल फॅसिझम' म्हणतो त्यात होतो; आणि कायद्यामध्ये याचा परिणाम हाती काहीच न लागता अनेक नियम केले जाण्यात होतो.

आपल्याला जर काय करणे आवश्यक असेल तर ते म्हणजे, एक, नियोजन प्रक्रियेची सुरुवात म्हणून अधिक विकेंद्रीकरण, आणि दोन, लोकांनासुद्धा स्वतःलाच त्यांच्या शहरी पर्यावरणाचे रक्षण करायचे असते, ही गोष्ट मान्य करणे. एखाद्या सुसंघटित गृहरचना वसाहतीत, मिळकतीच्या मालकीची सुरक्षितता असल्यामुळे घरमालक स्वतःच्या संपत्तीबद्दल प्रचंड अभिमान बाळगतात आणि सरकारवर जराही अवलंबून न राहता त्यांच्या वसाहतीतील पर्यावरण परिस्थिती सुधारण्यासाठी स्वतःच पुढाकार घेतात स्वच्छ रस्ते, मोठ्या सार्वजनिक जागा, उद्याने इ. ही मान्यता दूर ठेवली तर सतत, नागरिकांचे विस्तृत प्रमाणात दमन, जे निःशब्दपणे पण अत्यंत घातकप्रकारे काम करते आणि शहराचा नाश करते. लंडनचे माजी महापौर केन लिव्हिंगस्टन यांनी असेच काहीसे केले प्रत्येक भागाला काय आवश्यक आहे हे ठरवण्यासाठी त्यांनी अगदी छोट्या नियोजन एककांकडून शहराच्या वापरकर्त्यांचा प्रतिसाद मागवायला सुरुवात केली. आपल्याला माहितच आहे, की लंडनमध्ये अत्यंत उत्कृष्ट सार्वजनिक उद्याने आहेत. तसेच लंडनमध्ये कार्यक्षम सार्वजनिक वाहतुक यंत्रणा, प्रभावी ध्वनिनियंत्रण, चांगल्या दर्जाची हवा आणि वाहतुकीवरील बंधने आहेत. तेथे कित्येक ऐतिहासिक महत्वाच्या इमारती आहेत आणि तेथील सांस्कृतिक वारशासंबंधी कायद्यांमध्ये बदलत्या गरजा आणि अशा वास्तूंचे संवर्धन यांचा उत्तम समतोल राखला आहे. सध्या तेथे सरकारने घेतलेला नवीन पुढाकार म्हणजे बॅटरसी विद्युत केंद्राचा कायापालट करणे हा आहे. तेथून ॲटलांटिक महासागराच्या पलिकडे पाहिले तर मॅनहटनमध्ये म्हणजे मुंबईशी बरेचसे साधर्म्य दाखवणारे शहर गेली कित्येक वर्षे सातत्याने सार्वजनिक मोकळ्या जागांमध्ये भर टाकली जात आहे.

हे केवळ पर्यावरणाचे रक्षण नाही, तर हा शहराचा आराखडा आहे. ही शहराच्या रचनेची देखभाल आणि संवर्धन आहे. शहराची रचना आणि पर्यावरण हे एकच आहे, वेगळे नाही. या अत्यंत सुतर्कित दृष्टिकोनाचे अनुसरण न करणाऱ्या शहरावर होणारे परिणाम लक्षात घ्या. आपला कायदा 'समतोल विकासा'बद्दल बोलतो, आणि त्यात मोकळ्या जागा, पर्यावरणाचा विचार इ. गोष्टींचा उल्लेखही आहे. पण आपल्याला जे दिसते ते याच्यापेक्षा फारच वेगळे काही तरी असते. सार्वजनिक कारणांसाठी राखून ठेवलेल्या जागा उद्याने, खेळाची मैदाने, सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेसाठीची स्थानके, शाळा सतत कमी कमी होत चालल्या आहेत. त्यांच्या जागी उच्च वर्गीयांच्या गरजा भागवणारे मॉल्स आणि आलिशान सदनिकांच्या इमारती आपल्याला दिसतात. सार्वजनिक उद्यानाचा पर्याय मॉल कसा होऊ शकतो? असे बोलणे म्हणजेसुद्धा भाषेचा दुरुपयोग आहे आणि सारासार विचारांच्या संपूर्णपणे विरुद्ध आहे. आपल्याला पद्धतशीरपणे पर्यावरण नष्ट केले जाताना दिसते आहे, आणि त्यामुळे शहराच्या संपूर्ण रचनेची हानी होताना दिसते आहे.

नागरिक या समस्यांना जेव्हा न्यायालयात सामोरे जातात, तेव्हा तर बहुतेक वेळा भलतेच काही तरी निष्पन्न होते. पुण्यातील गणेशखिंड रस्त्यावरचे जुने वृक्ष रस्तारुंदीसाठी तोडण्याला जेव्हा न्यायालयात आव्हान दिले गेले, तेव्हा न्यायालयाला अत्यंत गंभीरपणे सांगण्यात आले की वृक्षच प्रदूषणाला कारणीभूत होतात. वकील महाशय म्हणाले, की वृक्षांमुळे गाड्यांना वेग कमी करावा लागतो, आणि गाड्यांची इंजिने 'आयडलिंग' करतात, म्हणून प्रदूषण होते. आणखी एका प्रकरणात फ्रेंड्स ऑफ ट्रीज ही एनजीओ कॅंडेल रोडवर केटरिंग कॉलेजच्या बाहेर असलेल्या दोन सुंदर, प्रचंड वृक्षांचे रक्षण करण्यासाठी न्यायालयात गेली. या वेळी खुद्द न्यायाधिशांनीच सांगितले की वृक्षांमुळे अपघात होतात. हे म्हणजे पावसामुळे पूर येतो असे म्हणण्यासारखे आहे.

नुकतीच सिटीस्पेस ने, सरकारने विकास आराखड्यात राखून ठेवलेल्या मैदाने आणि उद्यानांसाठीच्या मोकळ्या जागांवर झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करण्याच्या सरकारच्या निर्णयाला आव्हान देणारी जनहितार्थ याचिका न्यायालयात दाखल केली होती, त्या वेळी माझा जो वाद झाला, तो कदाचित माझ्या आयुष्यातील सर्वात विचित्र वाद असेल. आम्ही अजून रीतसर कामाला सुरुवातही केली नव्हती, तेवढ्यात एक हाय कोर्ट न्यायाधीश मोठ्याने उद्गारले, की ही याचिका 'अभिजनवादी' आहे. मी फक्त त्यांना खिडकीमधून बाहेर एक नजर टाकण्याची विनंती केली. श्रीमंत, अभिजन लोक आपल्याला संध्याकाळी मैदानांवर गप्पा मारत बसलेले दिसणार नाहीत. आणि हे इथल्याच नव्हे, तर दादर, माटुंगा, चेंबूर, कांदिवली अशा सगळ्याच भागांमधील मोकळ्या सार्वजनिक जागांबद्दल आहे. श्रीमंतांना त्यांचे खासगी विस्तीर्ण लॉन आणि गोल्फ कोर्स असलेले क्लब असतात. त्यांच्याकडे ते ज्यांना तथाकथित 'फार्महाउसेस' म्हणतात म्हणजे हजारो चौरस फुटांचे बंगले, अलिबागजवळ किंवा पूर्वी अत्यंत शांत असलेल्या पण आता भयंकर बजबजपुरी माजलेल्या लोणावळा-खंडाळा येथे तीही असतात.

या प्रकरणात सरकारने खरोखरच प्रतिज्ञापत्र सादर केले, की सरकार सरकारच्याच जमिनींवरील अतिक्रमणे थोपवू शकत नाही. थोडा विचार करा. सरकारच सांगते की सरकार झोपडपट्ट्या रोखू शकत नाही. एक तर सरकार पुरेसा निवारा पुरवत नाही. आणि नंतर सरकारला झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करायचे आहे मोकळ्या सार्वजनिक जागांवर. हे कसले नियोजन आहे, आणि याचा फायदा कोणाला होतो? उत्तर स्पष्ट आहे; याचा फायदा शहरातील जनतेला, स्वतः शहराला, किंवा शहराच्या रचनेलाही होत नाही.

मग झोपडपट्ट्यांमधील लोकांनी जायचे तरी कुठे? त्या वरिष्ठ न्यायाधीशांनी आता ते निवृत्त झाले आहेत विचारले. हायकोर्टाच्या हिरवळीवर येऊ द्या, मी सूचना केली, किंवा मुख्य न्यायाधीश, मुख्यमंत्री, महापौर, महानगरपालिकेचे आयुक्त, आरबीआय चे गव्हर्नर यांच्या बंगल्यांमधील हिरवळींवर काय हरकत आहे? सरकार जर या सरकारी जमिनींवरील अतिक्रमणे रोखू शकते, तर ते राखीव मोकळ्या जागांवरील अतिक्रमणे का रोखू शकत नाही?

मी तेव्हा चिडलो होतो, पण त्या न्यायाधीशांच्या प्रश्नामुळे या वादावर झगझगीत प्रकाश पडला आहे. आपण आपल्या सार्वजनिक मोकळ्या जागा झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करण्यासाठी सोडून द्यायच्या का? या मोकळ्या जागांचा फायदा फक्त श्रीमंतांनाच होतो, ही तर कपोलकल्पना आहे. पुनर्वसित झोपडपट्टी रहिवाश्यांनाही इतरांप्रमाणेच त्यांची गरज आहे. आणि परवडणारी घरे आणि पुरेशा मोकळ्या जागा या दोन्ही गोष्टी आपल्याकडे नसण्याचे कोणतेही कारण नाही. प्रत्येक गोष्ट वेगवेगळी आहे, प्रत्येक गोष्ट योग्य आहे, आणि प्रत्येक गोष्टीला रक्षणाची गरज आहे.

शहराच्या आरखड्याच्या आणि नियोजनाच्या संदर्भात पर्यावरणाचे रक्षण हा काही फक्त कायद्याच्या पुस्तकात अत्यावश्यक विषय आहे असे नाही. ती शहराच्या प्रत्येक वापरकर्त्याची गरज आहे. लोकांच्या कल्पनेमध्ये चांगल्या पर्यावरणाशिवाय असलेले शहर म्हणजे अनागोंदी, गोंधळ, कायद्याचा अभाव, आणि भ्रष्टाचार, असे धरले जाते, आणि हीच गोष्ट सध्याच्या आधुनिक संस्कृतीत प्रतिबिंबित होते. दोनच उदाहरणे पाहू. ख्रिस्तोफर नोलन हा चित्रपट दिग्दर्शक असून तो शहरांच्या कल्पना करतो. याचे धक्कादायक उदाहरण आपल्याला इन्सेप्शन मध्ये पहायला मिळते, पण त्यापूर्वीच्या दोन चित्रपटांमध्ये तो आपल्याला वेगळेच काही तरी दाखवतो. नोलनने बनवलेल्या दोन बॅटमॅनच्या चित्रपटांमध्ये आणि यात काहीही विनोद नाही बॅटमॅन बिगिन्स आणि द डार्क नाईट जे शहर दाखवलेले आहे, त्यातील संपूर्ण नैसर्गिक पर्यावरण नष्ट करण्यात आले आहे. त्या शहराचे जे बांधलेले स्वरुप आहे, ते गोथिक आहे, आणि त्याचा प्रचंड आकार आणि अंधार यामुळे ते अत्यंत भयप्रद दिसते. या शहरात आपल्याला कोणत्याही सार्वजनिक जागा, हिरव्या जागा, किंवा पर्यावरणाचा काही विचार केल्याचा काही मागमूसही कुठे दिसत नाही. या शहरात भ्रष्टाचार, निर्णायकी, बेशिस्त आणि सगळ्यात वाईट म्हणजे कोणत्याही प्रकारच्या कायद्याचा अभाव आपल्याला दिसतो. या उजाड शहरी ढाच्याचा आणि सर्व नागरी आणि सामाजिक व्यवस्था साफ कोलमडण्याचा थेट संबंध आहे.

मॅट्रिक्स च्या तीन चित्रपटांमध्ये तर हा विरोधाभास आणखीच अंगावर येतो कोणतेही नैसर्गिक पर्यावरण शिल्लक नसलेल्या ऱ्हास झालेल्या शहराचे आपल्याला असेच दृश्य दिसते. शेवटी दाखवलेले विमोचन एका मोठ्या विस्तीर्ण सार्वजनिक ठिकाणी, भरपूर झाडे असलेल्या एका उद्यानात, विस्तीर्ण पसरलेल्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर होते.

हे काही अपवाद नव्हेत याच गोष्टी वेगवेगळ्या स्वरुपांमध्ये आपल्याला चित्रकला, संगीताचे व्हिडिओ, पुस्तके, सर्वत्र दिसतात. थॉमस पिनकॉनच्या ग्रॅव्हिटीज रेनबो मध्ये दाखवलेले जग असेच आहे. सर्वनाशानंतर उध्वस्त झालेल्या जगातील हे शहर म्हणजे महानगरी नाही, तर ती मृत्यूनगरी आहे, मृत माणसांचे एक विस्तीर्ण असे कबरस्तान आहे. शहरातील पर्यावरणाच्या नाशाचे पर्यवसान शहर या संकल्पनेच्या आणि प्रत्यक्ष शहराच्या नाशात होते.

त्यामुळे आपल्याला जेव्हा शहरी ढाच्याबद्दल चर्चा करायला सांगतात, तेव्हा खरे म्हणजे आपल्याला पर्यावरणाबद्दल चर्चा करायला सांगतात. आपण जर असाच पर्यावरणाचा ऱ्हास करत राहिलो, तर आपण आपल्या शहरांचा आणि त्यांच्या वापरकर्त्यांचा भविष्यकाळच पायदळी तुडवणार आहोत. आपल्याला जर राहण्यायोग्य शहरे हवी असतील, तर आपल्याला त्यांच्या पर्यावरणाचे रक्षण केलेच पाहिजे; आणि शहराच्या वापरकर्त्यांचे, विशेषतः गरीब जनतेचे आणि बेघर लोकांचे रक्षण केल्याशिवाय पर्यावरणाचे रक्षण कधीच शक्य होणार नाही.




૨૦૦૧


૨૦૧૧





छायाचित्राचे श्रेय : राजेश वोरा


૨૦૦૧
૨૦૦૨
૨૦૦૪
૨૦૦૫
૨૦૦૭
૨૦૦૮










छायाचित्राचे श्रेय : राजेश वोरा